REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 9 | JUNE - 2022

# महाराष्ट्रातील शैक्षणिक विचारवंत व त्यांचे कार्य

**कुमारी उर्मिला वसंत लंबे**
**B.A., D.Ed**
**सहशिक्षिका श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला विजापूर रोड ,सोलापूर.**

**सारांश**




शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक विचार प्रवाहांना सुयोग्य वळण मिळवून देण्याचे काम शिक्षणाचे आहे. शिक्षणातील विचार प्रवाह आपल्या आचार, विचार आणि लेखणीद्वारे सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्याचे काम शैक्षणिक विचारवंत करत असतात. महाराष्ट्रातील काही थोर शैक्षणिक विचारवंतांच्या कार्याचा परिचय पुढीलप्रमाणे आहे. महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम स्त्री शिक्षणाचा पाया रचणारे महात्मा जोतीराव फुले, स्त्री शिक्षण कार्यासाठी व स्त्रियांच्या पुनरुद्धारासाठी आपले संपूर्णआयुष्य समर्पित करणारे महर्षी धोंडो केशव कर्वे, महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर शाळा, महाविद्यालये स्थापन करत वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देणारे कर्मवीर भाऊराव पाटील, मोफत व सक्तीचे शिक्षण पुरवण्यासाठी अमरावती जिल्ह्यात १०० शिक्षण केंद्रे उभारणारे डॉ. पंजाबराव देशमुख आणि कोसबाडसारख्या दुर्गम भागात बाल शिक्षणाची सुरुवात करत आदिवासी बालकांना विविध खेळांच्या माध्यमातून शिक्षण उपलब्ध करून देणाऱ्या अनुताई वाघ, या सर्वांच्या शैक्षणिक कार्याचा परिचय आपण आज करून घेणार आहोत.

## प्रस्तावना

शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल - म. फुले यांच्या मते आजची शिक्षण पद्धती ही बहुजन समाजाला शिक्षणपासून वंचित करणारी होती. तेव्हा शिक्षणप्रणाली बदलली पाहिजे यावर अधिक भर दिला गेला. केवळ कारकून वर्ग तयार करणा-या वर्गाची निर्मिती शिक्षणातून होऊ नये, तर मानवी जीवन जगण्यास सक्षम बनवणारे, उदयोगी, जीवनोपयोगी शिक्षण देण्यात यावे. त्रिभाषा सूत्राचा अवलंब - (१९६४-६६) च्या कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्रास जरी आजच्या कालावधीत मान्यता दिलेली असली तरी या अगोदर ७७ वर्षांपूर्वी म. फुले यांनी त्रिभाषा सूत्राचा अवलंब शिक्षणात करावा यावर भर दिला होता.

शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा - जनसामान्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा ह्यासाठी खेड्यापाड्यातील जनतेला शिक्षण घेता यावे म्हणून वसतिगृहाची व्यवस्था करण्याची कल्पना म. फुले यांनी मांडली आणि गरीब, होतकरू मुलांसाठी शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा देण्यावर भर दिला. शिक्षणाविषयक ज्ञान व विचार - शिक्षण हा तिसरा डोळाच मानले जाते आणि त्यामुळेच म. फुले यांनी शिक्षणावर अधिक प्रकाश टाकला आहे आणि शिक्षण कोणत्याही एका व्यक्तीची मक्तेदारी न बनता, सर्वांना शिक्षण मिळावे, शिक्षणाचा प्रसार होऊन, ज्ञान व विचारांची वृद्धी व्हावी यासाठी म. फुलेंनी योगदान दिले. म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून स्त्रियांसाठी तसेच मागासलेल्या अनाथाच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच बालगृहाची स्थापना देखील केली.

अशाप्रकारे म. फुले यांनी समाज परिवर्तनाचे कार्य करताना स्वत:च्या घरदाराचाही विचार न करता काम केले आणि म्हणून आज आपला समाज मानाने सर्व प्रकारचे शिक्षण घेत आहे. अशा शिक्षणतज्ज्ञाला, शिक्षणमहर्षीच्या कार्याला कोटी-कोटी वंदन.

शिक्षण व अभ्याशसक्रमातून प्रकट होणारा फूले शाहू आंबेडकरी विचार प्रा. वैशाली शा कंकाळे, अकोला आपल्या शिक्षणातून आणि तसेच्या अभ्यासक्रमातून महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रचारित व प्रसारित होत असतात. या थोर महापुरुषांचे सामजिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्वरूपातील विचार आपल्याला प्रेरित व प्रोत्साहित करीत असतात. त्याचे विचार २१ व्या शतकात आपल्या विदयार्थी वर्गाला नव्याने देणे आवश्यक आहे.

शिक्षण हा जीवनाचा आधार आहे. शिक्षणापासून आपण आपणास वेगळे करू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती हा शिक्षण देणारा एक महत्वपूर्ण ग्रंथ आहे. केवळ त्याच्याकडून आपण काय घ्यावे हे आपणास कळायला पाहिजे. शिक्षण ही जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का जगावे, जीवन कसे जगावे, जीवनाची सार्थकता कशामध्ये आहे, जीवन पूर्ण कसे करावे. आपण जीवनातून काय घ्यावे व इतरांना काय दयावे. या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच'शिक्षणानेच सर्व काही होत आहे, त्याकरिता आधी शिक्षण घेतलेच पाहिजे

जीवन शिक्षण ही काळाची गरज बनली आहे आणि आपल्या सर्व थोर शिक्षणतज्ज्ञांनी, विचारवंतांनी, समाजसुधारकांनी जीवन शिक्षणाची धुरा सांभाळली आहे आणि सर्वांना जगण्याची एक दशा आणि दिशा देण्याची महत्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. २१व्या शतकामध्ये शिक्षण घेणारा समुदाय मोठया प्रमाणात वाढला आहे. पण त्यातून जीवनविषयक शिक्षण मिळत आहे काय? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. तेव्हा आपल्या शिक्षणतज्ज्ञांचे आजच्या शिक्षणातून व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार निश्चितच येणा-या भविष्यकालीन समस्यांचे निराकरण व उत्तम जीवन जगण्यासाठी दिशादर्शक ठरतील. यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मार्गदर्शनपर आहेत. शिक्षण आणि अभ्यासक्रमामध्ये जे विचार आहेत. ते याच थोरांचे आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार - स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे म. फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते. त्यांनी मेकॉलेच्या खलित्यास कडाडून विरोध केला.'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचारास फुलेंचा विरोध होता कारण इंग्रजाचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकावा यावर होता. 'प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण दयावे 'आधी कळस मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षणप्रणाली असण्यावर म. फुलेंचा आग्रह होता.

## महात्मा जोतीराव फुले :

महात्मा जोतीराव फुले यांनी महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणाचा पाया रचला. स्त्री शिक्षणासोबतच मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी देखील भरीव कामगिरी केलेली आहे. समाजामधील स्त्री-पुरुष समानतेसाठी व शिक्षण प्रसारासाठी १८७३ मध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी ‘सत्यशोधक समाजा’ची स्थापना केली. भारतातील श्रीमंतापासून ते गोरगरिबांपर्यंत प्रत्येकाला शिक्षण मिळावे यासाठी १८८२ मध्ये हंटर आयोगासमोर भारतातील लोकांना सक्तीचे, विनाशुल्क व सार्वत्रिक स्वरूपाचे शिक्षण शासनामार्फत द्यावे अशी मागणी केली. असेच एक निवेदन १८८८ मध्ये व्हिक्टोरिया राणीचे प्रतिनिधी ड्युक ऑफ कॅनॉट यांना देखील दिले होते.

## महर्षी धोंडो केशव कर्वे :

स्त्री शिक्षण ही परमेश्वराची आराधना मानून आपले संपूर्ण आयुष्य स्त्री शिक्षणासाठी समर्पित करणारे थोर शैक्षणिक विचारवंत म्हणजे महर्षी धोंडो केशव कर्वे होत. महर्षी कर्वे यांनी लहान बालिका, अनाथ बालिकांपासून तर प्रौढ महिलांपर्यंत सर्वांसाठी शिक्षणाचे कार्य करत असताना अनाथ बालिकाश्रमापासून ते महिला विद्यापीठापर्यंत अनेक शिक्षण संस्थांची स्थापना केली. महर्षी कर्वे स्त्री

शिक्षणासच देशकार्य समजत असत. महर्षी कर्वे यांनी शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषेस महत्त्वाचे स्थान दिले. परंतु याच वेळी इंग्रजी भाषेचे महत्त्वही अधोरेखित केले. शिक्षणामध्ये केवळ तात्त्विक अभ्यासक्रमाचाच समावेश न करता विविध खेळ, नृत्य, संगीत, चित्रकला, बांधकाम, कार्यानुभव अशा उपक्रमासही महत्त्वाचे स्थान दिले. महिला विद्यापीठाच्या माध्यमांमधून समाज परिवर्तन घडवून आणले.

**कर्मवीर भाऊराव पाटील :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेमधून आणि महात्मा जोतीराव फुले यांच्यातून स्फूर्ती घेऊन रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिक्षणाची गंगा नेऊन पोहचवण्याचे महान व पवित्र कार्यकर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या संस्थेचे बोधचिन्ह म्हणून 'वटवृक्षाचे' चित्र ठरवले. प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतचे शिक्षण उपलब्ध करून देणाऱ्या शैक्षणिक संस्था असाव्यात याच संकल्पनेमधून कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, विधी, अभियांत्रिकी या विद्याशाखांसह अनेक प्राथमिक, माध्यमिक विद्यालयांची स्थापना केली. भाऊराव पाटील हे खऱ्या अर्थाने कार्यवादी होते. त्यामुळेच त्यांनी श्रमजीवी व बुद्धिवंताचा मेळ आपल्या संस्थांमधून घातला. याचा फायदा ग्रामीण भागांमधून अनेक डॉक्टर्स, वकील, प्राध्यापक, शिक्षक, समाजसेवक, आधुनिक शेतीनिष्ठ पदवीधर तयार करण्यासाठी झाला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९२१ साली वाळवा तालुक्यातील नेरले येथे वसतिगृहाची स्थापना केली. या वसतिगृहात अस्पृश्यांसहित सर्व जाती-धर्मांचे विद्यार्थी राहत असत. कुणाही एकावर भोजनाचा खर्च पडू नये म्हणून 'मुष्टीफंड' ही अभिनव योजना सुरू केली. (मुष्टीफंड ही अभिनव योजना घरातील बाई जेव्हा जात्यावर दळण्यासाठी बसायची तेव्हा फक्त एक मूठ धान्य टांगलेल्या त्या पिशवीत टाकायची नंतर वसतिगृहातील मुले किंवा शिक्षक ती पिशवी घेऊन जात. यास एक झोळी योजना असेही म्हणतात).

**डॉ. पंजाबराव देशमुख:**

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अविकसित समाज अधिकाधिक शिक्षणाच्या प्रवाहात कसा येईल यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. अविकसित समाज शिक्षणाच्या प्रवाहात आला पाहिजे याकरिता वसतिगृहयुक्त शिक्षण, शाळा महाविद्यालयाची स्थापना रूरल इन्स्टिट्यूट यांसारख्या माध्यमा मधून प्रयत्न केले. 'शेतीला जसे पाणी तसे समाजाला शिक्षण' हा मूलमंत्र बाळगणारे एक पुरोगामी विचाराचे शैक्षणिक विचारवंत म्हणजे डॉ.पंजाबराव देशमुख. डॉ. पंजाबराव देशमुखांच्या कार्यामुळे सक्तीचे, विनाशुल्क व सार्वत्रिक शिक्षण सुरू करण्यात अमरावती जिल्ह्याने संपूर्ण भारतामधून दुसरा क्रमांक पटकावला होता.विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी वसतिगृहाची सुविधा उपलब्ध झाली पाहिजे या विचारामधून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी श्री शिवाजी शिक्षणसंस्था अमरावतीच्या माध्यमिक शाळांना लागून वसतिगृहाची स्थापना केली. मुला-मुलींच्या उच्च शिक्षणाची सोय झाली पाहिजे व ग्रामीण भागामधील मुलांना पदवी मिळवता आली पाहिजे याकरिता विदर्भामध्ये अनेक महाविद्यालये सुरू केली.

**अनुताई वाघ :**

अनुताई वाघ यांनी ताराबाई मोडक यांच्या मदतीने व मार्गदर्शनातून बालशिक्षणाच्या इतिहासात अनेक प्रयोग केलेले आहेत. अनुताईनी कोसबाड ता. डहाणू, जि. पालघर या आदिवासी वस्तीच्या भागात आदिवासी बालकांना विविध खेळांच्या माध्यमांमधून शिक्षण दिले. अनुताईंनी १९४९ ते १९५६ या कालावधीत एकूण १५ अंगणवाड्या चालवल्या. व्यावसायिक शिक्षणातून आदिवासींना रोजगार मिळवून दिला. यासाठी अनुताईंनी विकासवाडी ही योजना सुरू केली. ग्रामसेविका, बालसेविका, अंगणवाडी यांसाठी डॉ. चित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचे प्रशिक्षण वर्ग घेतले. आदरणीय ताराबाई मोडक यांचे शैक्षणिक कार्य एक निष्ठावान अनुयायी म्हणून अनुताई वाघ यांनी चालू ठेवले.

अनुताई वाघ यांनी निरपेक्ष वृत्तीने बाल शिक्षणाचे कार्य संपूर्ण आयुष्यभर केले. माँटेसरीला पर्याय म्हणून बालवाडी या संकल्पनेची सुरुवात केली. आदिवासी शिक्षणाचेव्यवस्थापन प्रत्यक्ष त्यांच्यामध्ये राहून केले. अंगणवाडी, बालवाडी, अध्यापकांसाठी विविध प्रयोग व प्रशिक्षण वर्गांचेआयोजन केले. अनुताई वाघ यांनी बोर्डी, कोसबाडच्या आदिवासी परिसरामध्ये १० पाळणा घरे, ११ बालवाड्या, ४ पूर्व प्राथमिक शाळा, ३० प्रौढ शिक्षण संस्था, बाल सेविका प्रशिक्षण वर्ग, अंगणवाडी प्रशिक्षण वर्ग, अध्यापक प्रशिक्षण विद्यालय, रात्र शाळा, कुरण, मूकबधीर संस्था डहाणू, स्त्रीशक्ती जागृती संस्था, ठाणेअशा अनेक संस्था स्थापन केल्या. त्या काळात बोर्डी, कोसबाड हेआदिवासी परिसर बालशिक्षणाच्या प्रयोग शाळाच बनल्या. आदिवासींच्या कल्याणासाठी त्यांनी आपलेसंपूर्ण आयुष्य वेचले.

अनुताईंनी आपल्या शैक्षणिक संकल्पना, पद्धती आणि प्रयोग यांची चर्चा स्फूटलेख व पुस्तकांद्वारेकेली. त्यांनी बालवाडी कशी चालवावी, कुरणशाळा, विकासाच्या मार्गावर शिक्षण मित्र माला, कोसबाडच्या टेकडीवरून, सकस आहार गीते, सहज शिक्षण, बालवाडीतील गोष्टी, बडबडगीते, कृतिगीते, प्रबोधिका इ. पुस्तकांचेलेखन केले.

## शिक्षण व अभ्यायसक्रमातून प्रकट होणारा फूले शाहू आंबेडकरांचे विचार

आपल्या शिक्षणातून आणि तसेच  अभ्यासक्रमातून महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रचारित व प्रसारित होत असतात. या थोर महापुरुषांचे सामजिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्वरूपातील विचार आपल्याला प्रेरित व प्रोत्साहित करीत असतात. त्याचे विचार २१ व्या शतकात आपल्या विदयार्थी वर्गाला नव्याने देणे आवश्यक आहे. शिक्षण हा जीवनाचा आधार आहे. शिक्षणापासून आपण आपणास वेगळे करू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती हा शिक्षण देणारा एक महत्वपूर्ण ग्रंथ आहे. केवळ त्याच्याकडून आपण काय घ्यावे हे आपणास कळायला पाहिजे. शिक्षण ही जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का जगावे, जीवन कसे जगावे, जीवनाची सार्थकता कशामध्ये आहे, जीवन पूर्ण कसे करावे. आपण जीवनातून काय घ्यावे व इतरांना काय दयावे. या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच 'शिक्षणानेच सर्व काही होत आहे, त्याकरिता आधी शिक्षण घेतलेच पाहिजे'

जीवन शिक्षण ही काळाची गरज बनली आहे आणि आपल्या सर्व थोर शिक्षणतज्ज्ञांनी, विचारवंतांनी, समाजसुधारकांनी जीवन शिक्षणाची धुरा सांभाळली आहे आणि सर्वांना जगण्याची एक दशा आणि दिशा देण्याची महत्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. २१व्या शतकामध्ये शिक्षण घेणारा समुदाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पण त्यातून जीवनविषयक शिक्षण मिळत आहे काय? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. तेव्हा आपल्या शिक्षणतज्ज्ञांचे आजच्या शिक्षणातून व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार निश्चितच येणा-या भविष्यकालीन समस्यांचे निराकरण व उत्तम जीवन जगण्यासाठी दिशादर्शक ठरतील. यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मार्गदर्शनपर आहेत. शिक्षण आणि अभ्यासक्रमामध्ये जे विचार आहेत. ते याच थोरांचे आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार - स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे म. फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते. त्यांनी मेकॉलेच्या खलित्यास कडाडून विरोध 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचारास फुलेंचा विरोध होता कारण इंग्रजाचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकावा यावर होता. 'प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण दयावे 'आधी कळस मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षणप्रणाली असण्यावर म. फुलेंचा आग्रह होता. प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण' हे सूत्र अंमलात आणावे, यावर भर देण्यात आला.

## महात्मा फुलेंचे शिक्षण विषयक विचार

स्त्री-शिक्षणाचा पाठपुरावा - पूर्वीच्या काळामध्ये या परिस्थितीत स्त्रियांनी शिक्षण घेणे. म्हणजे अधर्मच करणे होय. त्यामुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कायमची उघडली जावी, म्हणून म. फुलेंनी स्त्री-शिक्षण मोहीम सर्वप्रथम हाती घेतली. शिक्षण हे समर्थ स्त्री

म्हणून जगण्यासाठी दिले जावे. स्त्रियांचा खरा धर्म त्यांना शिक्षण देणे होय. स्त्रियांच्या मानसिकतेसाठी व सक्षम स्त्री घडवण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. हे ओळखून म. फुलेंनी आपल्या पत्नीस शिक्षण देऊन आदय शिक्षिका म्हणून कार्यास सुरुवात केली आणि स्त्री-शिक्षण मोहमेस सुरुवात केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत - प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे आणि त्यामुळे हे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. तसेच म. फुले प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे प्रथम भारतीय नागरिक होते. ही मागणी त्यांनी १९ ऑक्टोबर १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगापुढे एका शिक्षणावर अधिक भर देईल तर नीतीच्या आणि सद्वर्तनाच्या दृष्टीने कितीतरी चांगले लोक शिकून तयार होताना मुळीच अडचण पडणार नाही. या विचारातून त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यावर भर दिला. प्राथमिक शिक्षकांची तरतूद करणे - प्राथमिक शिक्षणास मोफत व सक्तीचे केल्यास विदयार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता होते आणि त्याकरिता दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असणे देखील आवश्यक आहे आणि त्याकरिता प्रथम आवाज उठविणारे म. फुले हे एकमेव व्यक्ती होते. प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे. त्यामुळे या स्तरावरील शिक्षण उत्तम दर्जाचे असावे. यावर अधिक भर देण्यात आला.

प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे - सरकारी नोक-यांमध्ये सर्व वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी आहे, असे दिसून आल्यावर शिक्षण खालच्या वर्गातील तळागाळातील लोकांना मिळावे. यासाठी म.फुले यांनी प्राथमिक शिक्षण खालच्या वर्गास देण्यावर अधिक भर दिला. उच्च शिक्षणाकडे कमी व ग्रामीण जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणातून उद्याची भावी पिढी घडत असते आणि आज जे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. त्यामागे म. फुलेंचे विचार, असलेले दिसून येतात. आपल्या देशामध्ये आजची परिस्थिती लक्षात घेता कमी शिकलेले अध्यापक व अनुभव कमी असलेले शिक्षक प्राथमिक स्तरावर अध्यापन करताना दिसतात आणि अधिक अनुभवी व विषयतज्ज्ञ अध्यापक वर्ग वरच्या वर्गास अर्थात उच्च स्तर अध्यापन करतात. तेव्हा वेळोवेळी प्राथमिक शिक्षण अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण देणे ही काळाजी गरज बनली आहे आणि त्या दृष्टीकोनातून विचार म. फुलेंनी व्यक्त केले.

### कर्मवीर भाऊराव पाटील आणि शैक्षणिक चळवळ

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक चळवळीतून आणि त्यांच्या कृतीतून शिक्षण, समता, अस्पृश्य निर्मुलन, स्वावलंबन, ग्रामीण विकास, ग्रामीण भागात शिक्षणाचे जाळे, जागृतीसाठी बहुजनवादी चळवळीचा वापर अशा विविध कार्यक्रमातून आपला दृष्टिकोन पुढे आणलेला दिसून येतो. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक चळवळीतून शैक्षणिक संस्थाचे जाळे निर्माण केले आणि सत्यशोधक चळवळीतील कार्य केले. या कार्याच्या माध्यमातून आणि शैक्षणिक चळवळीतून त्यांना ग्रामीण भागातील मागास समाजात परिपक्वता, बहुजन समाजास हक्क, अधिकार, समता आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य केले. भाऊरावांनी केलेल्या कार्याला सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक अशा विविध बाजू होत्या. मात्र केंद्रस्थांनी बहुजन समाज होता. त्यांनी आपल्या शैक्षणिक चळवळीत बहुजनवादी विचार केंद्रस्थानी ठेवला होता. या सर्व कार्य आणि विचारातून त्यांनी बहुजन समाजाची जागृती केली असे दिसून येते. त्यामुळे या लेखात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विशेषत: बहुजनाच्या शैक्षणिक चळवळीवर थोडक्यात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

भाऊराव पाटील यांनी १९१५ फेब्रुवारी ते १९२१ च्या नोव्हेंबरपर्यंत सत्यशोधक समाजाचा प्रचार केला. तेव्हा समाज जातीपातीने विभागला होता. अज्ञानाने राजकीयदृष्ट्या इंग्रजांच्या गुलामगिरीत, तसेच धार्मिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरीत अडकलेला होता. भाऊरावांनी या सर्वांवर उपाय म्हणजे लोकांना 'शिक्षण' देणे हा विचार स्वीकारला. भाऊराव पाटलांची भूमिका ही बहुजन समाजाच्या समस्यांवर उपाय म्हणेज शिक्षण ही होती. केशवराव ठाकरे यांच्या विचारांनुसार स्वबळावर गोर-गरिबांचे शिक्षण कार्य सुरु केले. आपल्या स्वत:च्या घरात १९२४ मध्ये एक हरिजन विद्यार्थी ठेवून कार्यास सुरुवात केली. एकूणच बहुजनांच्या शिक्षणासाठी भाऊराव पाटीलांनी समाजातील प्रतिष्ठितांचे सहकार्य घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यामध्ये अपयश आल्यानंतर त्यांनी खचून न जाता स्वबळावर शिक्षणाचे कार्य करण्याचा निर्णय घेतला. रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेचा ठराव भाऊराव पाटील यांनी सामाजिक कल्याणाची भूमिका घेतली होती. सत्यशोधक समाजातील मंडळीनी ब्राह्मणेतर पक्ष स्थापन करून त्यांचा सत्तेत भागीदारी मिळविण्याच्या प्रयत्न होता.

ग्रामीण भागातील मुलामुलींचे शिक्षण - बहुजन समाज ग्रामीण भागामध्ये राहत असल्याने, त्यांच्या शिक्षणाची म. फुले यांना अधिक काळजी वाटत असे. २ मार्च १८८८ मध्ये म. फुले म्हणाले होते की आपली बहुतांश जनता खेड्यात निवास करते. तेव्हा शासनाने ग्रामीण लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे. राष्ट्रनिर्माणासाठी शुद्रांना शिक्षण - आपल्या देशात बहुजन समाज अजाण व अडाणी आहे. त्यांच्या उद्धारासाठी. शिक्षण हा एकमेव उपाय आहे. शुद्रांना शिक्षण देऊन सुशिक्षित केल्याशिवाय राष्ट्र बनू शकत नाही. ज्या देशात सामाजिक आणि आर्थिक गुलामी असते तेथे राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली पाहिजे. यावर अधिक भर होता.

स्त्री-शिक्षणाचा पाठपुरावा - पूर्वीच्या काळामध्ये या परिस्थितीत स्त्रियांनी शिक्षण घेणे. म्हणजे अधर्मच करणे होय. त्यामुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कायमची उघडली जावी, म्हणून म. फुलेंनी स्त्री-शिक्षण मोहीम सर्वप्रथम हाती घेतली. शिक्षण हे समर्थ स्त्री म्हणून जगण्यासाठी दिले जावे. स्त्रियांचा खरा धर्म त्यांना शिक्षण देणे होय. स्त्रियांच्या मानसिकतेसाठी व सक्षम स्त्री घडवण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. हे ओळखून म. फुलेंनी आपल्या पत्नीस शिक्षण देऊन आदय शिक्षिका म्हणून कार्यास सुरुवात केली आणि स्त्री-शिक्षण मोहमेस सुरुवात केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत - प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे आणि त्यामुळे हे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. तसेच म. फुले प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे प्रथम भारतीय नागरिक होते. ही मागणी त्यांनी १९ ऑक्टोबर १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगापुढे एका शिक्षणावर अधिक भर देईल तर नीतीच्या आणि सद्वर्तनाच्या दृष्टीने कितीतरी चांगले लोक शिकून तयार होताना मुळीच अडचण पडणार नाही. या विचारातून त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यावर भर दिला. प्राथमिक शिक्षकांची तरतूद करणे - प्राथमिक शिक्षणास मोफत व सक्तीचे केल्यास विदयार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता होती आणि त्याकरिता दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असणे देखील आवश्यक आहे आणि त्याकरिता प्रथम आवाज उठविणारे म. फुले हे एकमेव व्यक्ती होते. प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे. त्यामुळे या स्तरावरील शिक्षण उत्तम दर्जाचे असावे. यावर अधिक भर देण्यात आला.प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे - सरकारी नोक-यांमध्ये सर्व वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी आहे, असे दिसून आल्यावर शिक्षण खालच्या वर्गातील तळागाळातील लोकांना मिळावे. यासाठी म.फुले यांनी प्राथमिक शिक्षण खालच्या वर्गास देण्यावर अधिक भर दिला. उच्च शिक्षणाकडे कमी व ग्रामीण जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणातून उद्याची भावी पिढी घडत असते आणि आज जे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. त्यामागे म. फुलेंचे विचार, असलेले दिसून येतात. आपल्या देशामध्ये आजची परिस्थिती लक्षात घेता कमी शिकलेले अध्यापक व अनुभव कमी असलेले शिक्षक प्राथमिक स्तरावर अध्यापन करताना दिसतात आणि अधिक अनुभवी व विषयतज्ज्ञ अध्यापक वर्ग वरच्या वर्गास अर्थात उच्च स्तर अध्यापन करतात. तेव्हा वेळोवेळी प्राथमिक शिक्षण अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण देणे ही काळाजी गरज बनली आहे आणि त्या दृष्टीकोनातून विचार म. फुलेंनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील मुलामुलींचे शिक्षण - बहुजन समाज ग्रामीण भागामध्ये राहत असल्याने, त्यांच्या शिक्षणाची म. फुले यांना अधिक काळजी वाटत असे. २ मार्च १८८८ मध्ये म. फुले म्हणाले होते की आपली बहुतांश जनता खेड्यात निवास करते. तेव्हा शासनाने ग्रामीण लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे. राष्ट्रनिर्माणासाठी शुद्रांना शिक्षण - आपल्या देशात बहुजन समाज अजाण व अडाणी आहे. त्यांच्या उद्धारासाठी. शिक्षण हा एकमेव उपाय आहे. शुद्रांना शिक्षण देऊन सुशिक्षित केल्याशिवाय राष्ट्र बनू शकत नाही. ज्या देशात सामाजिक आणि आर्थिक गुलामी असते तेथे राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली पाहिजे. यावर अधिक भर होता.

शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल - म. फुले यांच्या मते आजची शिक्षण पद्धती ही बहुजन समाजाला शिक्षणपासून वंचित करणारी होती. तेव्हा शिक्षणप्रणाली बदलली पाहिजे यावर अधिक भर दिला गेला. केवळ कारकून वर्ग तयार करणा-या वर्गाची निर्मिती शिक्षणातून होऊ नये, तर मानवी जीवन जगण्यास सक्षम बनवणारे, उदद्योगी, जीवनोपयोगी शिक्षण देण्यात यावे. त्रिभाषा सूत्राचा अवलंब - (१९६४-६६) च्या कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्रास जरी आजच्या कालावधीत मान्यता दिलेली असली तरी या अगोदर ७७ वर्षांपूर्वी म.

फुले यांनी त्रिभाषा सूत्राचा अवलंब शिक्षणात करावा यावर भर दिला होता. शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा - जनसामान्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा ह्यासाठी खेड्यापाड्यातील जनतेला शिक्षण घेता यावे म्हणून वसतिगृहाची व्यवस्था करण्याची कल्पना म. फुले यांनी मांडली आणि गरीब, होतकरू मुलांसाठी शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा देण्यावर भर दिला.

## निष्कर्ष –

शिक्षणाविषयक ज्ञान व विचार - शिक्षण हा तिसरा डोळाच मानले जाते आणि त्यामुळेच म. फुले यांनी शिक्षणावर अधिक प्रकाश टाकला आहे आणि शिक्षण कोणत्याही एका व्यक्तीची मक्तेदारी न बनता, सर्वांना शिक्षण मिळावे, शिक्षणाचा प्रसार होऊन, ज्ञान व विचारांची वृद्धी व्हावी यासाठी म. फुलेंनी योगदान दिले. म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून स्त्रियांसाठी तसेच मागासलेल्या अनाथाच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच बालगृहाची स्थापना देखील केली. अशाप्रकारे म. फुले यांनी समाज परिवर्तनाचे कार्य करताना स्वत:च्या घरदाराचाही विचार न करता काम केले आणि म्हणून आज आपला समाज मानाने सर्व प्रकारचे शिक्षण घेत आहे. अशा शिक्षणतज्ज्ञाला, शिक्षणमहर्षीच्या कार्याला कोटी-कोटी वंदन.

कर्मवारी भाऊराव पाटील हे आधुनिक शिक्षणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. २२ सप्टेंबर १८८७ ते ९ मे १९५९ हा त्यांचा जीवनकाल. आपले संपूर्ण जीवन त्यांनी शिक्षणकार्यासाठी व्यतीत केले. पिढ्यानपिढ्या ज्ञानापासून वंचित असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना त्यांनी शिक्षणाचा मूलमंत्र देऊन आपले जीवन घडविण्यासाठी सक्षम केले. हे सर्व विद्यार्थी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील व आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील होते. ५ सप्टेंबर १९१९ रोजी कर्हा ड  तालुक्यातील काले या गावी सत्यशोधक समाजाची परिषद भरली होती. याच परिषदेत "रयत शिक्षण संस्था" स्थापन करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. व्यापक अर्थाने विचार केल्यास आपल्या समाजातील कष्टकरी व ग्रामीण भागातील बहुजन समाजामधील मुलांच्या शिक्षणासाठी स्थापन केलेली संस्था म्हणजे रयत शिक्षण संस्था,

धोंडेवाडीत रयत शिक्षण संस्थेने एक प्राथमिक शाळा सुरू केली. कर्मवीरांनी प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. प्राथमिक शिक्षण हा संपूर्ण शिक्षण प्रक्रियेचा पाया मानला पाहिजे. ते शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती, काले या गावात संस्थेमार्फत एक रात्रशाळाही सुरू केली होती. दिवसभर काबाडकष्ट करणाऱ्या व आपली उपजीविका कशीबशी करणाऱ्या प्रौढ व्यक्ती या रात्रशाळेत येत असत. ज्यास आज प्रौढ शिक्षण हे नाव आपण दिले आहे, त्या प्रौढ शिक्षणाचा प्रारंभही कर्मवीरांनी १९१९ सालीच केला होता, हे ध्यानात घेणे जरुरीचे आहे.

१९२१ साली सांगली जिल्ह्यातील नेर्ते या गावी वसतिगृह सुरू केले. वसतिगृहासाठी लागणारे धान्य घराघरांतून गोळा केले जाई. हीच ती "मुष्टिफंड योजना" होय.

## संदर्भ


- आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवरील संयुक्त राष्ट्रांच्या 1966 च्या आंतरराष्ट्रीय कराराचा कलम 13 शिक्षणाचा सार्वभौम अधिकार ओळखतो.
- "कन्फ्यूशियस आजही प्रासंगिक का आहे? त्याचा आवाज दाबून ठेवा".
- कॉलिन, अर्नेस्टो नृत्य आणि समारंभाद्वारे स्वदेशी शिक्षण: एक मेक्सिको पालिंपेस्ट. न्यूयॉर्क: पॅलग्रेव्ह मॅकमिलन.
- León-Portilla, Miguel   अझ्टेक विचार आणि संस्कृती: प्राचीन नहुआटल मनाचा अभ्यास. नॉर्मन: ओक्लाहोमा विद्यापीठ प्रेस
- रेगन, टिमोथी गैर-पाश्चिमात्य शैक्षणिक परंपरा: शैक्षणिक विचार आणि सरावासाठी पर्यायी दृष्टीकोन. महवाह, NJ: लॉरेन्स एर्लबॉम असोसिएट्स, प्रकाशक
- "ख्रिश्चन धर्म आणि मध्ययुग या दोघांचेही विज्ञान खूप ऋणी आहे: सोपबॉक्स विज्ञान".